


# ज्ञान प्रबोधिनी
## शैक्षणिक साधन केंद्र


**ई - प्रशिक्षक**




वर्ष ३: अंक ४

जानेवारी २०१६

राष्ट्रीय सौर पौष - माघ शके १९३७




संक्रमण



सामाजिक जाणीव संवर्धन

# संपादकीय

नुकताच अमरावतीला गेलो होतो. अमरावतीतील एक मित्र श्री. अतुल गायगोले यांनी एका शाळेची स्थापना केली आहे. शाळेचे नाव मोठे विचार प्रवर्तक आहे, ‘ शाश्वत’ स्कूल ! शिक्षण व्यवस्थेतील सारे ‘ शाश्वत’ त्यांना त्यांच्या आणायचे आहे. रुजवायचे आहे. शाश्वत - Sustainable हा सध्याचा परवलीचा शब्द आहे. शिक्षणातील शाश्वत काय? बदलणारे काय? याचा विचार केला पाहिजे. परिस्थिती, तंत्र, पद्धती बदलत राहतात. मंत्र दीर्घकाळ टिकून राहतो. शिक्षणातील शाश्वत विचारात हा मंत्र कोणता याचा विचार झाला पाहिजे. मनुष्याला सुखाने जगण्यासाठी अनेक भौतिक साधने मिळवावी लागतात. त्यासाठी आवश्यक शास्त्रे आणि कलांचे शिक्षण व्हावे लागते. शाळा – महाविद्यालयांतून असे शिक्षण मिळत असते. काळाच्या ओघात या शिक्षणात बदल होत गेला. काही शास्त्रे-कला कालबाह्य झाली तर नवीन विषयांचा समावेश झाला. हे ‘ जेवणदायी ‘ शिक्षण झाले. हे शिक्षणही सर्वांसाठी आणि अधिकाधिक परिपूर्ण करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी आवश्यक असे शैक्षणिक आराखडे तयार होत असतात. त्यांच्या कार्यवाहीसाठी सर्व स्तरांवर प्रयत्न होत असतात.

पण ‘ जीवनदायी शिक्षणाचे ‘ काय? मनुष्यासाठी भौतिक सुख आवश्यक आहेच ! पण शाश्वत सुखाचे, आनंदाचे काय ? मनुष्याला असे शाश्वत सुख – समाधान मिळायचे असेल तर त्याला स्वत:च्या अस्तित्वाचा, समाजातील त्याच्या स्थानाचा विचार करावा लागेल. त्यासाठी आपल्या पूर्वसूरींनी आनंदमय कोशाच्या विकासाचा मार्ग सांगितला आहे. आजच्या शालेय शिक्षणाच्या आराखड्यात या अध्यात्म विद्येचे स्थान असले पाहिजे तर शिक्षणातला शाश्वत विचार झाला असे म्हणता येईल !

विवेक पोंक्षे

संपादक , ई-प्रशिक्षक

## स्मृतीतून स्फुरो कृती

### कै. डॉ.वि.वि.तथा आप्पा पेंडसे जन्मशताब्दी वर्षे ‘

ज्ञान प्रबोधिनी या अभिनव शैक्षणिक प्रयोगाची सुरुवात कै. डॉ.वि.वि.तथा आप्पा पेंडसे यांच्या प्रतिभेतून झाली. आप्पांचे शैक्षणिक कार्य व विचार, अभिनव शैक्षणिक प्रयोग यांचा परिचय आपण या लेखमालेत करून घेत आहोत.

“शिक्षण म्हणजे काय चार क्रमिक पुस्तकांचे शिक्षण आहे? शिक्षण हे त्यापेक्षा वेगळे आहे. शिक्षण हे मनुष्यघडणीसाठी, समाजघडणीसाठी आहे. शिक्षणाने राष्ट्र घडायला पाहिजे”. कै.आप्पांनी मांडलेले हे सूत्र ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक चिंतनाचे मध्यवर्ती सूत्र आहे. आज या सूत्राचा विस्तार करत ज्ञान प्रबोधिनीची वैशिष्ट्यपूर्ण शैक्षणिक अनुभव प्रणाली तयार झाली आहे.

कै.आप्पांनी मांडलेले विचारस्मरण आचारस्फुरण ठरावे यासाठी ‘स्मृतीतून स्फुरो कृती’ या मालिकेत शिक्षण विचारासोबत ज्ञान प्रबोधिनीत राबवले जाणारे व आपण आपल्या शालेय रचनांत करू शकाल असे शैक्षणिक उपक्रम सुचवत आहोत व निवडक उपक्रमांचा विस्ताराने परिचय या लेखमालेत करून देत आहोत.

# ‘संक्रमण’

बदल अथवा संक्रमण हा मानवी जीवनातील अविभाज्य भाग बनला आहे. सातत्याने समाजात, घरात, मनात, वातावरणात हे संक्रमण चालू असते. मकरसंक्रमणाच्या निमित्ताने संक्रमण म्हणजे काय? आणि हे संक्रमण कोणकोणत्या पातळीवर घडते ह्या दृष्टीने थोडेसे चिंतन केले असता अनेकविध विचार मनःपटलावर उमटले.

संक्रमण म्हणजे स्थित्यंतर, बदल, परिवर्तन, नवविचारांचे स्पंदन, वैचारिक आदानप्रदान, परस्पर स्नेह अथवा सामंजस्य यांची जपणूक, नूतन अभिव्यक्ती असे विविध अर्थप्रकार ‘संक्रमण’ या शब्दातून व्यक्त होतात. मकरसंक्रमण अथवा मकरसंक्रांत म्हणजे सूर्य ज्या दिवशी मकर राशीत प्रवेश करतो, त्या दिवसाला मकरसंक्रांती असे संबोधले जाते. जुने वाद-विवाद, मनातील किल्मिषे संपवून पुनश्च स्नेह अथवा गोडी निर्माण करणे यासाठी हा सण साजरा केला जातो.

सातत्याने होणाऱ्या बदलांना जर आपण सकारात्मक रीतीने सामोरे गेलो तर ते नक्कीच सुखावह ठरतात. कोणतीही नवीन गोष्ट शिकताना थोडे कष्ट पडतात. पण नंतर मिळणारा आनंद हा खूप काही देणारा असतो. काही नवीन संकल्पाची सुरुवात देखील आपल्याला या निमित्ताने करता येते. आज सर्वाधिक बदल हे विद्यार्थी जीवनात घडताना दिसतात. रोज काहीतरी नवीन त्यांच्यापर्यंत पोचत असते. हा बदल त्यांच्याशी निगडीत विविध क्षेत्रांमधला असतो. हे बदल त्यांच्या व्यक्तिमत्व विकासात देखील अनेक दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतात. विद्यार्थी जीवनात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विविधांगी विकास हा खूप महत्त्वाचा आहे. या प्रक्रियेत युक्ताहार विहार, मानसिक विकास, स्नेह, मैत्री, आपुलकी, स्वाध्याय या सर्वच मुद्यांचा विचार करावा लागतो. या काळात ऋतूनुसार आवश्यक असे धान्य शेतात उपलब्ध असते. ते आपल्या शरीरासाठी पोषक असेच असते. तीळ, गूळ, बाजरी यांसारख्या विविध पदार्थांचा आपण आहारात समावेश करतो. तीळाची स्निग्धता आणि गुळाचा गोडवा याच कालावधीत अनुभवायला मिळतो. त्या त्या ऋतूनुसार उपलब्ध असणाऱ्या अन्नाचा समावेश आपण आहारात नक्की करावा. योग्य प्रकारचा व्यायाम, चांगला आहार, आणि तसाच योग्य विहार यामुळे व्यक्तिमत्व विकास घडून येण्यास मदत होते. व्यायामाने शरीर व मन सुदृढ करण्याचा प्रयत्न करावा. शारीरिक क्षमता वाढवण्याचा प्रयत्न करावा. कारण, ‘ केल्याने होत आहे रे आधी केलेचि पाहिजे’ हा मंत्र तर सर्वज्ञात आहेच.

हा सण स्नेहाचा, आपुलकीचा, मैत्रीचा, जिव्हाळ्याचा असा आहे. या निमित्ताने हा नात्यांमधील, मैत्रीमधील गोडवा जपण्याचा, वाढवण्याचा आपण प्रयत्न करायला हवा. विद्यार्थी दशेतील मैत्री ही अतूट, जीवाभावाची अशी असते. मैत्रीतील हा गोडवा आपण कायम जपण्याचा प्रयत्न करायला हवा. हाच तर महत्त्वाचा संदेश या सणातून आपल्याला मिळतो. स्वावलंबन आणि स्वाध्याय हा देखील विद्यार्थी जीवनातील महत्त्वाचा भाग आहे. स्वतःची कामे स्वतः करणे यातून मिळणारा जो आनंद आहे त्याची जाणीव विद्यार्थ्यांना करून द्यायला हवी. तो आनंद घ्यायला त्यांना शिकवायला हवे. तसेच स्वाध्यायाच्या बाबतीत देखील आहे. स्वयं अध्ययनाने जितके शिकता येईल तितके शिकण्याचा प्रयत्न करावा. आणि जिथे अडचण येते तिथे मार्गदर्शकांचे, गुरुजनांचे मार्गदर्शन घ्यावे. स्वाध्यायामुळे आपल्या पद्धतीने आपल्याला अध्ययन करणे सोपे जाते.

समर्थ रामदासांनी ‘समर्थांचा बोध’ यांतून मुलांना खूप छान उपदेश केला आहे. **‘बरे सत्य बोला यथा तथ्य चाला,** किंवा **‘दिसामाजी काहीतरी ते लिहावे, प्रसंगी अखंडीत वाचीत जावे’** यांसारखे श्लोक मुलांसाठी खूप प्रेरणादायी ठरतात.

ते मुलांनी पाठ करावेत आणि तसे वागण्याचा प्रयत्न करावा.  कारण वाचन, अध्ययन, मनन, चिंतन ह्याविविध पायऱ्या अध्ययनासाठी अत्यावश्यक आहेत. समर्थ रामदासांनी लिहीलेले मनाचे श्लोक देखील खूप उद्बोधक  आहेत. **'मना सर्वथा सत्य सांडू नको रे, मना सर्वथा मिथ्य मांडू नको रे'** यांसारखे श्लोक खूप काही सांगणारे आहेत, समजावणारे आहेत. आपणच जर आपल्या मनाला समजावले तर ते आपले नक्की ऐकते.  कारण एखादी गोष्ट मनाने घेतली की ती नक्की पूर्ण होते. म्हणून स्वतःच्या मनाला कायम उपदेश करणे, समजावणे गरजेचे आहे. हे मन सुदृढ असेल तरच बाकीच्या गोष्टी सुकर होतात. म्हणून मन हे निश्चयी, सावध, तत्पर, धैर्यशील, सामर्थ्यपूर्ण असावे.

ह्या सणाच्या निमित्ताने अनेकतेतून एकता साधता येते. तीळगुळातील अनेक रंग हे वैविध्य दर्शवतात. आपला देश जसा विविध भाषांनी, रंगांनी, वेषभूषांनी नटलेला आहे तशाच प्रकारे आपली मने, आपले विचार हे सर्वसमावेशक असावेत. प्रत्येकाची हा सण साजरा करण्याची पद्धत निराळी पण त्यामागची भावना मात्र एकच असते. सर्वजण ह्यानिमित्ताने एकत्र येतात. यातूनच राष्ट्रभावना वाढीस लागते. साधली जाते. प्रत्येकाची सण साजरा करण्याची पद्धती समजून घ्यावी.

अध्यापकांच्या दृष्टीने जर आपण विचार केला तर त्यांच्या क्षेत्रात देखील सातत्याने बदल घडताना दिसतात. शिक्षणप्रक्रियेत सातत्याने बदल घडत असतात त्या बदलांशी त्यांना जुळवून घ्यावे लागते. वेगवेगळया प्रकारचे विद्यार्थी शिक्षकांच्या समोर असतात त्या प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोचण्याचे महत्त्वाचे काम शिक्षकांचे असते. यासाठी अध्यापनात विविध प्रकारचे बदल करावे लागतात. हे एक प्रकारचे संक्रमणच असते. ज्या वाणीचा उपयोग करुन शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवतात, त्यांच्याशी संवाद साधतात ती वाणी मधुर, निर्मळ, स्वच्छ आणि ओघवती असावी. कारण त्यांचे बोलणे हा एक प्रकारचा वाक् यज्ञच आहे. ज्याचा उल्लेख संत ज्ञानेश्वरांनी पसायदानातून केला आहे. (येणे वाक् यज्ञे तोषावे)  ह्या वाक् यज्ञाच्या माध्यमातून आचार, विचार, आणि उच्चार ह्यातिन्ही गोष्टी प्रभावीपणे पोचवता यायला हव्या. योग्य ते बदल तिथे घडायला हवेत. अध्यापकांच्या उक्ती आणि कृती यांत साम्य हवे.  कारण त्याचा फार मोठा प्रभाव विद्यार्थ्यांवर पडतो. ह्या अध्यापकांच्या संवादातून विद्यार्थी मैत्र घडायला हवे. अध्यापन हे केवळ शिकवणे न होता तो संवाद व्हायला हवा यामुळे शिकणे आणि शिकवणे ह्या दोन्ही प्रक्रिया आनंददायी होतात.विद्यार्थ्यांना अध्ययनात कशी रुची निर्माण होईल ह्याचा विचार करत अध्यापनात बदल घडवायला हवेत. यासाठी स्वाध्याय खूप महत्त्वाचा ठरतो.  जसा विद्यार्थ्यांना तो आवश्यक आहे तसाच तो अध्यापकांना देखील आवश्यक आहे. कारण माणूस हा नेहमी शिकतच असतो. ही प्रक्रिया निरंतर चालणारी आहे. त्यामुळे स्वउन्नयन साधण्याचा प्रयत्न अध्यापकांचा नेहमीच असावा. आणि त्याचबरोबर नवनवीन बदलांना समोरे जाताना स्वतःमध्ये ते बदल घडवण्याची तयारी अध्यापकांनी ठेवायला हवी. अध्यापकाची भूमिका निभावताना देखील विविधांगी भूमिका अध्यापकाला पार पाडाव्या लागतात. म्हणूनच बदल अथवा परिवर्तन हा समाजाचा आवश्यक भाग आहे.  आणि वैविध्य, नाविन्य, कौशल्य आहे म्हणून काम करण्यात, जीवनात मजा आहे.  हे संक्रमण अथवा बदलच नवी उमेद, प्रेरणा, आशा देणारे आहे. म्हणूनच ह्या सर्व बदलांना आपण उत्साहाने सामोरे जाऊया आणि तीळगुळाचा गोडवा हा जनाजनांत, मनामनात वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करुया.

॥तीळगूळ घ्या गोड गोड बोला॥

**डॉ.सौ.सुजाता रिसबूड-बापट.**

**ज्ञान प्रबोधिनी पुणे .**

# विचार - स्फुरण

## सामाजिक जाणीव निर्माण करणारे शिक्षण

ज्ञान प्रबोधिनीत कसलं शिक्षण दिलं गेलं पाहिजे याची चर्चा आपण करत आहोत. सामान्य प्रतीचं आणि केवळ पुस्तकी असं शिक्षण देण्यासाठी प्रबोधिनी नाही. हे तर प्रबोधिनीच्या घटनेच्या अगदी पहिल्याच कलमात म्हटलं आहे. सामाजिक जाणीव निर्माण करणारं शिक्षण देण्यासाठी प्रबोधिनी आहे. याचा अर्थ असा नाही की विज्ञान, तंत्रज्ञान, कला इ.च्या शिक्षणाला येथे स्थान नाही. आपण तर म्हणतो की, 'प्रबोधिनीला राष्ट्रीय जीवनाच्या प्रत्येकच क्षेत्रात नेतृत्व करू शकणारे कार्यकर्ते निर्माण करायचे आहेत.' उद्या कोणा कार्यकर्त्याला किंवा कार्यकर्तीला नृत्यशाळा काढावीशी वाटली तर त्याही कल्पनेचं स्वागत करण्याची भूमिका हवी. उद्याच्या प्रबोधिनीत संगीतावरही महत्त्वपूर्ण काम व्हायला हवं आहे. जे जे काही पूर्वार्जित धन आहे ते सर्व आपल्याला वाढवायचं आहे. ' आहे तितुके जतन करावे, पुढे आणखी वाढवावे, महाराष्ट्र राज्यचि करावे चोहिकडे' असे समर्थांनी म्हटले. त्याप्रमाणे आपल्याला भारतीय किंवा हिंदु संस्कृतीने केलेल्या मूलभूत चिंतनाचा विकास करणारे जे जे काही असेल त्या सगळ्याचा परिपोष करायचा आहे.

तेव्हा प्रबोधिनीतला विद्यार्थी हा आधुनिकातला आधुनिक असाही हवा आणि त्याच वेळी त्याला आपल्या अगदी जुन्यातल्या जुन्या अशा धनाचीही जाण हवी. तो पौर्वात्यातील पौर्वात्य आणि पाश्चात्यांतील पाश्चात्य अशा स्वामी विवेकानंदांसारखा हवा. असे विद्यार्थी निर्माण करू या. दुसऱ्याच्या संस्कृतीने दीपून जायला नको, पण स्वत:च्या संस्कृतीचा फाजील अभिमानही नको. आपली मातृभाषा, आपली राष्ट्रभाषा यावर जसं प्रभुत्त्व हवं तसं इतर परदेशी भाषांवरही प्रभुत्त्व हवं. भारतीय खेळाप्रमाणे पाश्चात्य खेळही खेळता यावेत. एकीकडे परिपूर्ण व्यक्तिविकसनाचे प्रयत्न चालू असतानाच ते विकसित व्यक्तित्व समाजाच्या विकासासाठी समर्पित कसं करायचं ते आपल्या मुलामुलींना शिकवू या. समाज - संस्थापनेच्या कल्पनेशी तादात्म्य पावलेले व्यक्तिविकसन करायला शिकवू या. समाज -संस्थापना, राष्ट्र निर्माण , धर्मसंस्थापना हे सारे समानार्थी शब्द आहेत. व्यष्टी आणि समष्टी ही दोन्ही एकमेकांना पूरक आहेत. समाजाचा कोणताही घटक मागासलेला राहून समाजाचा विकास होऊ शकणार नाही. तसेच काही व्यक्तींचा अनिर्बंध विकास ही कल्पना खोटी आहे. समाजाशिवाय व्यक्ती खऱ्या अर्थाने समृद्ध जीवन जगूसुद्धा शकणार नाही.

**कै. आप्पा पेंडसे.**

**राष्ट्रदेवो भव (पान २,३)**

# आचार - स्फुरण

## सामाजिक जाणीव संवर्धन

'पुण्य पर उपकार -पाप ते परपीडा' ह्या एकाच वाक्यात संतांनी सामाजिक जाणिवेची व्याख्या केली आहे. दुसऱ्या व्यक्तीची अडचण अथवा गरज ओळखून सहजपणे त्याचा विचार करणे, त्याच्याशी समरस होणे आणि त्यानंतर शक्य त्या प्रकारे साहाय्य करण्याची प्रेरणा प्रत्यक्षात उतरवणे अशी ही सामाजिक जाणिवेची पायरी पायरीने होणारी अभिव्यक्ती आहे.

हे ' दुसरे' लोक आपल्या कुटुंबातील सदस्य असू शकतात. शेजारीपाजारी असू शकतात. गावातील अठरापगड प्रकारचे असू शकतात, कधीही न पाहिलेले देशबांधवही असू शकतात. जसजशी ही वर्तुळं विस्तारत जातात तसतशी सामाजिक जाणीव अधिक प्रगल्भ आणि दृढ होत जाते. काही वेळा ती व्यक्तिगत आचरणातून प्रगट होते तर कधी सामूहिक वर्तनातून! उदा. माझ्या वाढदिवशी मिळालेले पैसे मी वस्तू खरेदीसाठी न वापरता माझ्याच वयाच्या अनाथ मुलांबरोबर खाऊ खाण्यासाठी खेळण्यासाठी वापरणार आहे' असे ठरवणे हा वैयक्तिक प्रतिसाद आहे, तर शाळेच्या आसपासच्या वस्तीतील मुलांना शिकायला मदत व्हावी म्हणून एखाद्या गटाची जुळवाजुळव करून त्यांनाही असे काम करायला प्रवृत्त करणे हा सामूहिक प्रतिसाद आहे. भ्रष्टाचार विरोधी आंदोलनांत सर्वांच्या बरोबरीने मोर्चात अथवा उपोषणात सामील होणे, हा सुद्धा सामूहिक आविष्कारच आहे.

' सामाजिक जाणीव' जन्मजात असते का? ती फक्त काहीच जणांमध्ये आपोआप निर्माण होते का? तिचा आणि शिक्षण प्रक्रियेचा काही संबंध आहे का? जाणीवपूर्वक तिचे विकसन करणे शक्य आहे का? कोणत्या वयात त्याची सुरुवात व्हायला हवी? असे अनेक प्रश्न आपल्याला पडतात.

' सामाजिक जाणिवेची उर्मी' ही प्रत्येक माणसात जन्मजात असते असे मानसशास्त्रज्ञ मानतात. ह्याउर्मीच्या प्रकटीकरणासाठी अनुरूप वातावरण आणि संधी मिळण्याची गरज असते. ज्या वयात मुलांची ' स्व' ची जाणीव निश्चित होत असते, त्या वयात जर त्यांच्यासाठी समाजदर्शनाची, स्वपलीकडे इतरांचा विचार करण्याची संधी दिली तर त्यांचा दृष्टीकोन अधिक विधायक होऊ शकतो. सामाजिक जाणिव संकल्पनेचा ज्ञान पातळी. अभिवृत्ती पातळी आणि कृती -प्रेरणा पातळी या तीन टप्प्यात विचार करता येईल.

उदा. : पर्यावरणाबद्दलची विधायक जाणीव पूर्णत्वाने निर्माण झाली असे आपण केव्हा म्हणू ?

१) जेव्हा त्याबद्दलचे ज्ञान अधिकाधिक मिळवण्याचा प्रयत्न होईल.

२) त्यातून ' पर्यावरण' विषयाचे आकलन आणि त्यातील अन्य घटकांबद्दलचा नेमका दृष्टीकोन निर्माण होईल. आणि

३) त्यातून पर्यावरणपूरक अशी काही ठोस कृती व्यक्तिगत ( उदा. कचऱ्याचे व्यवस्थापन / इंधन बचत) किंवा सामूहिक (उदा.गावाजवळच्या देवराईचे रक्षण ....) कृती करण्याची प्रेरणा मनात जागी होईल.

सामाजिक जाणीव कोणत्या टप्प्यांनी विकसित होते.-


१) इतरांचा स्वीकार २) इतरांबरोबर वाटून घेणे ३) इतरांचा आदर ४) इतरांबरोबर समायोजन ५) इतरांच्या विकासात सहभाग .

अशा पद्धतीने 'सामाजिक जाणीव' शिक्षण प्रक्रियेतून विकसित करायची असेल तर त्यासाठी प्रेरणासंपन्न शिक्षकांची गरज आहे. त्याचबरोबर अध्ययन तंत्रांमधील-कृतीखेळ, गटचर्चा, प्रश्नमंजूषा, अनुभवकथने, गटकार्ये, गटअभ्यास, जोडीकार्ये, क्षेत्रभेटी अशा अनेकविध तंत्रांचा समुचित उपयोग करणे शक्य आहे. यातून मुलांच्या विचारांना खाद्य मिळून त्यांचे दृष्टीकोन योग्य रीतीने घडतील व आपापल्या स्तरावर काही कृती करण्यासाठी ती उद्युक्त होतील. शालेय गटाबरोबर महाविद्यालयीन व प्रौढ गटाच्या 'सामाजिक जाणिवेचे' असे यत्नपूर्वक विकसन शक्य आहे. आशय व तंत्रे गटसापेक्ष / विषयसापेक्ष असू शकतील. ज्ञान प्रबोधिनीच्या प्रज्ञा मानस संशोधिकेत अशी सामाजिक जाणीव वाढवता येते हे सिद्ध झाले आहे व त्याचा अभ्यासक्रम तयार झाला आहे. दैनंदिन तासिका तसेच शिबिरांमध्ये या प्रकारचे उपक्रम योजता येतील.

संदर्भ ग्रंथ : सामाजिक जाणीव संवर्धन : वा.अनघा लवळेकर , ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन.

समृद्ध शिक्षणातून समर्थ भारत

## पुस्तक परिचय




माणसांमुळे घर उभे राहाते. अनेक घरे मिळून समाज निर्माण होतो आणि अशा ह्या विशाल समाजाचे राष्ट्र बनते. घर –समाज आणि राष्ट्र ह्या तिन्ही पातळीवर राष्ट्राची प्रतिमा आधारलेली असते. वरील तिन्ही संबंध जेवढे सुदृढ तेवढी राष्ट्र प्रतिमा चांगली बनते. पण ह्यातिन्हीत समन्वयासाठी सामाजिक जाणीव असणे खूप महत्त्वाचे असते. ही सामाजिक जाणीव म्हणजे नेमके काय? ह्यामूलभूत प्रश्नाचा विचार करत असताना या प्रक्रियेला गती देण्यासाठी एखादे शैक्षणिक साधन आहे का? हा परिणाम सर्वाधिक व नेमका होण्यासाठी काय करायला हवे? अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी वा.अनघा लवळेकर यांचे पी.एच.डी. साठीचे संशोधन झाले.

सामाजिक जाणीव म्हणजे नेमके काय? ही संकल्पना, त्याची व्याप्ती आणि स्वरूप ह्या पुस्तकात अतिशय सोप्या भाषेत स्पष्ट केले आहे. ही जाणीव बाल्यावस्थेपासून ते वृद्धावस्थेपर्यंत, घरापासून ते समाजापर्यंत अशा विस्तीर्ण स्तरावर आवश्यक असते. याची मांडणी या पुस्तकात विस्ताराने केली आहे. ही सामाजिक जाणीव कशा पद्धतीने निर्माण करता येईल याविषयीच्या विविध तंत्रांचा, कौशल्यांचा, पद्धतींचा समावेश यात केलेला आहे. ही सामाजिक जाणीव मोजायची कशी? याचा देखील सखोल विचार इथे केला आहे. तोंडी/ लेखी प्रतिक्रिया, काही प्रसंग, प्रसंगपूर्ती, कथापूर्ती अशा माध्यमांचा वापर करून ह्यासामाजिक जाणिवेचे मूल्यमापन करता येते.सामाजिक जाणीव ह्यासंकल्पनेचे उपयोजन नेमके कशा प्रकारे करता येईल यासाठी विविध कृती, छोटे छोटे प्रयोग ह्यापुस्तकात आहेत. सामाजिक भान निर्माण करणारे अत्यंत उपयोगी असे हे पुस्तक आहे .

# आचार - स्फुरण

## समाज दर्शन उपक्रम कसे योजावेत

**हेतू** : समाजात घडणाऱ्या घटनांची व सामाजिक स्थितीची जाणीव व्हावी, समाजातील विविध प्रश्नांची अथवा समस्यांची ओळख व्हावी, लोकजीवनाची माहिती व्हावी आणि एखादा प्रबोधनात्मक विचार समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचवावा व त्यायोगे त्यांचे आपल्या जीवनातील महत्त्व विद्यार्थ्यांना कळावे या हेतूने सोलापूर ज्ञान प्रबोधिनीमध्ये हा समाजदर्शन उपक्रम योजला जातो .

**स्वरूप** : या उपक्रमाच्या स्वरूपाचा विचार करता, शाळेच्या चार भिंतीबाहेर जाऊन, विविध सामाजिक घटकांपर्यंत पोहोचून सद्य:स्थितीची जाणीव करून घेऊन, विविध प्रश्न किंवा समस्यांचा विचार करून एखादा विचार समजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जातो.

**कार्यवाही** : सोलापूर ज्ञानप्रबोधिनीत १५ वर्षे केलेल्या या उपक्रमात, प्रशालेतील इयत्ता तिसरी ते दहावीतील आठ ते दहा विद्यार्थ्यांचा एक गट केला जातो. असे किमान ५० ते कमाल १०१ गट अभियान पद्धतीने म्हणजे एकाच दिवशी बहुतांश गट नियोजित ठिकाणी कार्यक्रम सादरीकरणासाठी जातात. शहर वा जिल्ह्यातील शाळांची माहिती घेणे, स्वामी विवेकानंदांचे विचार जिल्ह्यातील १०१ गावातील १०१ शाळांमध्ये पोहोचविणे, स्त्रीशक्ती, जाणीव जागृती व बचतगट महिलांचे कार्य तसेच शाळांमध्ये जाऊन मातृभूमीपूजन करणे असे अनेक कार्यक्रम घेतले जातात.

**अभ्यासाची गरज** : अशा या उपक्रमाची परिणामकारकता जाणून घेताना, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण होऊन त्यांना एखाद्या समस्येची ओळख होवून विद्यार्थ्यांच्या कौशल्यात भर पडते व व्यक्तिमत्व विकासाला या उपक्रमाची मदत होते का याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यासाची पद्धत** : उद्दिष्टानुसार उपक्रमाचा परिणाम अभ्यासण्यासाठी विद्यार्थी व गटमार्गदर्शक यांना सोडविण्यासाठी दिलेल्या प्रश्नावलीच्या आधारे निरीक्षणे व निष्कर्ष नोंदविले.

**निरीक्षणे** -

१. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण झाली.

२. विविध सामाजिक घटकांचे आपल्या जीवनातील महत्त्व विद्यार्थ्यांना कळले.

३. लोकप्रबोधनाबरोबरच एखादा विचार विद्यार्थ्यांना समाजापर्यंत पोहोचविता आला.

४. शाळेचे प्रतिनिधित्व करतो हा भाव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाला. याचबरोबर जबाबदारीची जाणीवही निर्माण झाली.

५. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात काही बदल झालेले दिसले.

६. सादरीकरण किंवा सराव करताना एकमेकांना सहकार्य करण्याची वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये वृद्धिंगत झाली.

७. नेतृत्व करण्याचे कौशल्य दिसले.

८. गटबांधणीचे तंत्र अवगत झाले.

<u>**निष्कर्ष**</u> : १. विद्यार्थी गटप्रमुख म्हणून जबाबदारी घेतात.

२. विद्यार्थ्यांना सामाजिक समस्येची जाणीव होते.

३. विद्यार्थ्यांना समाजातील अशिक्षितता अधिक प्रमाणात जाणवते.

४. विद्यार्थी शाळेचे प्रतिनिधित्व करतात.

५. विद्यार्थी सादरीकरणाची कौशल्ये प्राप्त करतात.

६. कार्यक्रम प्रभावी होण्यासाठी आवश्यक कौशल्ये विद्यार्थी प्राप्त करतात.

७. विद्यार्थ्यांना कृतियुक्त व आशयपूर्ण कार्यक्रम सादर करायला आवडतात.

८. चालू घटनांच्या संदर्भात असणाऱ्या विषयांचा प्रभाव विद्यार्थ्यांवर अधिक पडतो.

९. विद्यार्थ्यांमधील नेतृत्व कौशल्य वाढते.

माधुरी कुलकर्णी

ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर

ज्ञान प्रबोधिनी द्वारा आयोजित राष्ट्रीय शिक्षण परिषदेत सादर केलेला शोध निबंध









# आचार - स्फुरण

## सामजिक जाणीव संवर्धनासाठी चे कृती कार्यक्रम

### जर मी ..............असतो / असते तर .............

**हेतू** : मुलांच्या मनात समानुभूती (Empathy ) ची भावना निर्माण करणे .

**कृती** : एखाद्या सुस्थित व्यक्तीच्या आयुष्यातील अशा एखाद्या धक्कादायक प्रसंगाचे वर्णन किंवा कथन करावे की जेव्हा त्याला आपल्या असहायतेची जाणीव झाली असेल.उदा. ( मध्यान्ह -लेखक श्री.भा.महाबळ, दै.सकाळ) किंवा वंचित गटातील एखाद्या व्यक्तीच्या अनुभवाचे वाचन / कथन. ( उदा.-पोरके दिवस -लेखक अरुण खोरे, बेरड -लेखक भीमराव गस्ती, तराळअंतराळ-लेखक शंकरराव खरात. ) मुलांसमोर व्हावे. त्या व्यक्तीच्या भावना, विचारांबद्दल काही प्रतिक्रिया, टिप्पणी करून, त्यात मुलांचाही सहभाग घेऊन मग खालील सूचना द्याव्यात -

“ इथे मी चार प्रकारच्या व्यक्तींचं वर्णन लिहिणार आहे.

१) शारीरिकदृष्ट्या अपंग मुलगा / मुलगी.

२) बालकामगार .

३) ग्रामीण भागातील एक मुलगी.

४) एक गरीब पण हुशार, बुद्धिमान मुलगा / मुलगी.

त्यांपैकी कुठल्याही एका प्रकारच्या व्यक्तीच्या जागी स्वत:ला कल्पून तुमच्या मनात येणाऱ्या भावना आणि विचार लिहायचे आहेत. आधारासाठी काही मुद्दे खाली दिले आहेत.

लिखाणासाठी / चर्चेसाठी मुद्दे :

- मला कोणकोणत्या प्रश्नांना, अडचणींना सामोरं जावं लागतं?
- माझं आयुष्यातील सगळयांत मोठे ध्येय कोणते?
- समाजातल्या इतर व्यक्तींकडून मला काय हवं आहे?
- मुलांचं लेखन संपल्यानंतर काही प्रातिनिधिक मुलांना त्यांचे लेखन.

सामाजिक जाणीव संवर्धन





# सामजिक जाणीव संवर्धनासाठी चे  कृती कार्यक्रम

## साखर शाळेला भेट

आमच्या शाळेत दर गुरुवारी होणाऱ्या 'सामाजिक जाणीव' च्या प्रकल्पाच्या तासामुळे आम्हांला समाजात घडणाऱ्या घटनांची माहिती मिळाली. त्यामुळे गरिबांविषयीची आत्मीयता वाढली. अंधश्रद्धांचे आमच्या मनात जे काही थोडे स्थान होते, ते नष्ट होण्यास मदत झाली.

या ' सामाजिक जाणीव' प्रकल्पातून आम्हांला थेऊर येथे साखर शाळेतील मुलांना शिकवायला जायचे आहे, हे कळल्यावर तेथे जाण्याची उत्सुकता वाढली आणि ४.२.२००० ला आम्ही सकाळी ७.०० च्या बसमध्ये बसलो आणि ८.३० ला पोहोचलो; पण शाळेत मुलेच नव्हती. तेव्हा आम्हांला शिक्षकांनी सांगितले की या मुलांना त्यांच्या घरी जाऊन बोलवावे लागते.

तेव्हा आमचा एक ग्रुप त्यांच्या शाळेतील दोन शिक्षिकांच्या बरोबर गेला. तेव्हा आम्हांला असा अनुभव आला की त्यांतील काही मुलांना खरंच खूप शिक्षणाची आवड होती. शाळेत न येणाऱ्या मुलांची आर्थिक परिस्थिती त्यामागे कारणीभूत असते. त्यामुळे या साखर शाळेत त्यांना मोफत शिक्षण व शिक्षणाचे सर्व साहित्य दिले जाते आणि ज्यांना इच्छा नव्हती ते कोपऱ्यांमध्ये लपून बसत होते. नंतर आम्ही या सर्वांना शाळेत घेऊन गेलो व तेथे त्यांच्याबरोबर मनसोक्त गप्पा मारल्या. अभ्यास घेतला. खेळ घेतले. त्यांची स्वत:ची इच्छा, मनातील भावना विचारल्या. तिथल्या ९ ते १० तासांत आम्ही एकमेकांत इतके रमून गेलो होतो की शेवटी परतताना आमच्या डोळयांत अश्रू उभे राहिले आणि ती चिमुकली पाखरे ' रहा' म्हणत होती.

या सर्व अनुभवांतून मला कळले की या समाजाकडे आपण कधीही एवढे बारकाईने लक्ष दिलेले नाही. या मुलांकडे पाहिले आणि त्यांची परिस्थिती, त्यांची शिक्षणाबद्दलची ओढ, त्यांच्या इच्छा, भावना यांच्यामध्ये त्यांची आर्थिक परिस्थिती तर आड येतेच; पण कधी कधी घरातील मोठ्या व्यक्तींचाही शिक्षणाला नकार असतो, हे लक्षात आले. समाजात असेही लोक असू शकतात की जे स्वत: शिकले आणि त्यांना दुसऱ्यांचे भविष्य सुधारण्याची तीव्र इच्छा आहे. असे अनेक शिक्षक व व्यक्ती आम्हांला तेथे भेटल्या; पण खरचं या शाळेत मुलांच्या चेहऱ्यावर मला उद्याचे ( भावी) आदर्श नागरिक होण्याची आशेची किरणे दिसत होती.

या मुलांच्या आमच्याकडूनही काही अपेक्षा होत्या. त्यांना वाटत होतं, आम्ही त्यांच्याबरोबर कबड्डी खेळावी. आम्ही त्यांच्याबरोबर खेळलो आणि त्यांनी आम्हांला हरवलेही. आपल्या शहरी जीवनापेक्षा ते कितीतरी दूर आहेत. यापेक्षा काही वेगळे असू शकते, याची मला कल्पनाच नव्हती. या प्रकल्पाच्या निमित्ताने मी थेऊरला गेले आणि तेथील साखरशाळेतील चिमुकल्या मुलांना शिकवण्याची संधी मला मिळाली. तेथे गेल्यावर त्या मुलांमधील शिक्षकांविषयीचा आदर आणि शिस्त यांचे आम्हांला दर्शन झाले. आम्हांलाही बाहेरचे जग कसे असते, ते या अनुभवावरून कळले.

माझ्या आयुष्यातला हा क्षण मी कधीही विसरणार नाही आणि 'ताई-ताई' म्हणणाऱ्या त्या चिमुकल्या पाखरांनाही मी कधीच विसरणार नाही. आजही मला त्यांची आठवण येतच असते. असा कँप जर परत काढला तर मी त्याच उत्साहाने त्या कँपला जाईन.

अशा समाजातील शिक्षणाची इच्छा असणाऱ्या मुलांना शिक्षणाची चांगली संधी मिळावी आणि त्यांची शिक्षणाची इच्छा पूर्ण व्हावी ही देवापाशी प्रार्थना करते. अशा मुलांसाठी मी माझ्या जीवनातील वेळ देऊ शकले त्याबद्दल मला फार आनंद वाटतो. याशिवाय माझ्याजवळ काही बोलायला आणि त्या मुलांचे कौतुक करायला शब्दच मिळत नाहीत.




ज्ञान प्रबोधिनी मध्यवर्ती सहविचार
समिती ची थेऊर येथील साखरशाळा भेट

छ.शाहू सह.साखर  कारखाना .
ता.कागल.
जि. कोल्हापूर .






जवाहर साखरशाळा

## पाणी—जीवनदायी अमृत

सध्याची ज्वलंत आणि सर्वांना भेडसवणारी समस्या म्हणजे पाण्याची समस्या होय. अशा प्रकारची सामाजिक संसाधने वापरताना प्रत्येकाने काळजी घ्यायला हवी. अगदी बाल्यावस्थेतच ह्याविषयीची जाणीव मुलांमध्ये निर्माण व्हायला हवी. ही जाणीव शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करायला हवी. त्या दृष्टीने हा ओघतक्ता उपयोगी पडेल.

**प्रशिक्षकाची पूर्वतयारी :**

- पाणी समस्येवरील विविध लेखन, वस्तुनिष्ठ माहितीसाठी वाचन करणे.
- विविध जलसिंचन, जलविद्युत, दैनंदिन जलपुरवठा योजनांची किमान माहिती असणे.
- स्वत: पाण्याचा वापर काळजीपूर्वक, विचारपूर्वक केलेला असणे.
- ‘ प्रश्न आणि प्रश्न ‘ या डॉ.अनिल अवचट यांच्या पुस्तकाचे वाचन केलेले असणे.





**सचेतक :**

चित्रपट्टिका ( पाणी)
दिग्द. सुमित्रा भावे.

किंवा

वृत्तपत्रातील एखादे कात्रण
( उदा.-जलनीती -दै.सकाळ )

↓

‘ पाणी’
आपल्या आयुष्याचा इतका महत्वाचा भाग आहे ?

↓

ही चित्रपट्टिका पाहताना / ही माहिती ऐकताना तुम्हांला काय वाटलं?

↓

‘ पाण्याची’ समस्या निर्माण होण्यामागं काय काय कारणं असू शकतील असं तुम्हांला वाटतं?

**संभाव्य परिणाम :**

- पाण्याशिवाय जीवन नाही . रोजची गरज, विजेसाठी. वातावरणाचा आवश्यक घटक.
- वाईट वाटलं, खेड्यातल्या बायकांची अडचण कळली, पाण्याचा वापर कसा केला जातो ते समजलं इ.......
- अतिरिक्त वापर, नीट नियोजन नाही, प्रदूषण, वाया घालवणे, असमान वाटप इ.......

# सामजिक जाणीव संवर्धनासाठी चे  कृती कार्यक्रम

## जाहिरातींचा भूलभुलैया

**हेतू** : जाहिरातींच्या फसव्या रुपाची जाणीव करून देणे व वस्तुनिष्ठ जाहिरातींचा वापर विधायक कामासाठी करण्याची इच्छा निर्माण करणे.

**साहित्य** : काही वृत्तपत्रीय जाहिरातींची कात्रणे , पेन , वही, दूरदर्शनवरील जाहिरातींचे विषय लिहिलेले कागद.  ( उदा.- धुण्याची पावडर, सौंदर्य प्रसाधने, शीतपेये, इलेक्ट्रॉनिक उपकरणे...... )  मोठी मोकळी जागा  ( हॉल,मैदान, व्हरांडा इ. )

**कृती** :  सत्र संचालकाने ४ / ५ जण प्रत्येक गटात याप्रमाणे मुलांचे गट करावेत. पुढील सूचना द्याव्यात.-आज आपण एक वेगळाच गमतीशीर खेळ खेळणार आहोत. आपण वृत्तपत्रात, रस्त्यावर, टी.व्ही.वर अनेकदा जाहिराती बघत असतो. त्या खूप आकर्षक, रंगीबेरंगी, आपल्या आवडत्या चित्रपट तारे-तारकांनी काम केलेल्या असल्यामुळे आपण त्या वस्तू विकत घेतो; पण अनेकदा नंतर आपल्या लक्षात येतं, की त्या जाहिरातींमध्ये दिलेली आश्वासने फसवी आहेत. तरीही आपण पुन:पुन्हा त्या जाळ्यात अडकत राहातो. आज आपण छोट्या खेळातून त्यावर विचार करणार आहोत. मी प्रत्येक गटाला एक चिठ्ठी देईन. त्यावर एका उत्पादनाचे नाव लिहिलेले असेल. तुम्ही गटागटात चर्चा करून त्या उत्पादनाच्या जाहिरातीतील विसंगती, फसवेपणा शोधून काढायचा आहे  आणि त्यावर एक छोटे ३ / ४ मिनिटांचे प्रसंगनाट्य सर्वांसमोर सादर करायचे आहे. यासाठी चर्चेला व तयारीला तुम्हांला २०-२५ मिनिटे मिळतील. सर्वांना विषय समजला का? चला तर मग  ‘- ( सत्र संचालकाने चिठ्ठ्या वाटाव्या व मुलांना गटांत चर्चेस बसवावे. सुमारे २०-२५ मिनिटांनी सर्वांना एकत्र करून नाट्यसादरीकरण करून घ्यावे. )

चर्चे साठी मुद्दे :

- आता आपण जो विचार केला, जे सादरीकरण केलं त्यातून काय जाणवतं?
- आपण अशा जाहिरातींमुळे कसे फसतो?
- या  उत्पादनांची मूळ किंमत आणि बाजारातील किंमत यात जाहिरातीचा पैसाही ग्राहकाकडून कसा वसूल केला जातो?
- त्यासाठी काय विचार केला पाहिजे असं वाटतं?
- काही वेळा जाहिरातींमधून विधायक विचारही प्रसृत केले जातात का? नेमकी माहिती दिली जाते का?
- काही जाहिरांतींमुळे स्त्रियांबद्दल अनावश्यक गैरसमज पसरवले जातात असं तुम्हांला वाटतं का? कोणत्या? (साबण, प्रसाधनं, LIC,...... )
- आपण जाहिरात बघताना काय सावधगिरी बाळगली पाहिजे असं तुम्हांला वाटतं?

सामाजिक जाणीव संवर्धन









# ज्ञान – सेतू

## सामजिक जाणीव संवर्धनासाठी च्या कृती कार्यक्रमातील सहभागी सदस्याचे मनोगत




**चीम्पूच्या शाळेत स्ट्रॉ पासून फव्वारा बनवायला शिकवताना कार्यकर्ते आणि खेळण्याच्या माध्यमातून centrifugal force शिकताना मुले.**

ज्ञान प्रबोधिनी, पुणे यांच्याEducational Activity and Research Center ( EARC ) या विभागाने 'ज्ञान सेतू' हा उपक्रम सुरु केला आहे. सध्या याच विभागात कार्यरत असल्याने मला या उपक्रमाचा भाग बनायची संधी मिळाली. ज्ञान-सेतू या उपक्रमाचा उद्देश त्याच्या नावावरून स्पष्ट व्हायला मदत होते. भारतातील चार विकासाच्या दृष्टीने मागास (Developmentally challenged ) राज्यांशी (जम्मू-काश्मीर, छत्तीसगड, अरुणाचल प्रदेश व आसाम) विज्ञानातील मूलभूत तत्त्वांच्या सहाय्याने पूल विकसित करण्याचा प्रयत्न केला जातो. प्रामुख्याने ५वी ते ९वी वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी टाकाऊ कचऱ्यापासून विविध खेळणी किंवा मॉडेल्स बनवणे व त्यांच्या सहाय्याने वैज्ञानिक तत्त्वे शिकणे/ शिकवणे- असे या उपक्रमाचे स्वरूप असते. यासाठी लागणारे प्रशिक्षण व नियोजन ज्ञान प्रबोधिनीच्या विविध कार्यशाळांमधून होते. त्यामुळे या क्षेत्रात नवीन असलेले माझ्यासारखे तरुण देखील आत्मविश्वासाने सहभागी होतात.

या उपक्रमांतर्गत पंधरा दिवसांसाठी (१६ नोव्हेंबर ते १ डिसेंबर) आम्ही चार जणांच्या गटात अरुणाचल प्रदेशमध्ये गेलो होतो. तिथे आम्ही इटानगर भागातील एकूण आठ शाळांमध्ये गेलो. पूर्वेकडील हिमालयाच्या उंच उंच पर्वत रांगांच्या कुशीत, हिरव्यागार शालूत बांबूची घरे आणि मानवाने तयार केलेली दुनिया. सूर्य शक्य तितक्या लवकर आपली पहाट करतो व संध्याकाळी इतक्या लवकर जातो की संध्याकाळी ५ वाजताच आपल्याला सात वाजल्या सारखे भासते. तिथे कडाक्याच्या थंडीमध्ये सेतू बंधनाचे काम सुरु होते. बाहेर आणि आत. वर वर हा उपक्रम ज्या प्रमाणे समाजातील दोन घटकांमध्ये bridgeबांधण्याचे काम करतो. त्याच प्रमाणे आपल्या आत हृदयात देखील एक सेतू बांधला जातो. या उपक्रमातून मला खूप निखळ आनंद मिळाला, प्रवासात कोलकत्ता, गुवाहाटी, इटानगर भागात पर्यटन झाले पण या पेक्षा जास्त पटींनी मला शिकायला शिकायला मिळाले. काय शिकायला याचे थोडक्यात आढावा घेतो. अर्थात हे मी त्रोटक निरीक्षणावर आधारीत लिहित आहे. यात काही माझी मते देखील आहेत.

- विद्यार्थ्यांना खेळण्यातून आणि दैनंदिन जीवनातील वैज्ञानिक तत्व दाखवताना मी माझ्या दैनंदिन व्यवहाराकडे अधिक सजगतेने पाहू लागलो. विज्ञान समजावून घेवू लागलो.

विद्यार्थी शाळेमध्ये फक्त स्वत: येत नाहीत तर त्यांच्याबरोबर शाळेबाहेरचा आख्खा समाज शाळेत येत असतो. म्हणून

वर्गात विद्यार्थ्यांशी संवाद करताना विविध सामजिक आयामांना देखील विचारात घ्यावे लागते.

♦ उदा. अरुणाचल हा जवळपास २६ आदिवासी जमातींचे राज्य आहे. एकूणच आदिवासी वृत्ती 'आजच्या जीवनासंबंधी आम्ही समाधानी'-- त्यामुळे उद्याची चिंता नाही. आणि म्हणूनच शिक्षण, त्याद्वारे विविध व्यवसाय व त्यातून विकास असे काही समीकरण नाही (जे सामान्यतः आपण ठेवतो). त्या मुळे ९वी-१०वी शिकल्यानंतर पुढे विशेष असे काही नसतेच. म्हणून तेथील तरुणांना शिक्षणाची गरज तीव्रतेने भासत नाही. याविरुद्ध विशेष राज्याचा दर्जा मिळाल्यामुळे भारत सरकारकडून विविध मार्गांनी प्रचंड पैसा येतो. याचा विनियोग करण्यासाठी तरुणांकडे – मोबाईल, चारचाकी व दुचाकी गाड्या, फॅशन व व्यसन – हेच मार्ग उपलब्ध असतात. यासाठी मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन हे TV वरील जाहिरातींकडून मिळत असते. ही सगळी पार्श्वभूमी घेऊन विद्यार्थी वर्गात बसलेला असतो. मग त्याला शाळा जे काही शिकवते हे परके तर वाटतेच, पण आवडत देखील नसते.

♦ बऱ्याच शाळांमध्ये वरच्या वर्गात (८वीच्या पुढे) मुलांची संख्या कमी दिसली. पण वर्गात मुलींची संख्या मुलांच्या दुप्पट असायची. कारण तिथे मुळातच मुलींची संख्या खूप जास्त आहे असे नाही तर मुलांना संयमात ठेवणे हे सर्वात महाकठीण काम आहे असे शिक्षकांना वाटते. बऱ्याचशा शाळांनी वरील वर्ग फक्त मुलींसाठी-- असे ठरवले आहे.

· तंत्रज्ञान बदलास कारणीभूत ठरु शकते.

♦ अरुणाचल मधील संस्कृती जोपासली जावी म्हणून तिथे Inner line permit काढल्याशिवाय प्रवेश करण्यास बंदी आहे. पण एवढी कडक सुरक्षा असताना देखील तिथल्या लोकांच्या राहणीमानावर जाहिरातींचा व पाश्चात्य संस्कृतीचा खूप पगडा आहे. यासाठी इतर कारणे असू शकतीलच पण TV हे मोठे कारण दिसते.

· अनेक लोक स्वयं-सेवी संस्थांच्या माध्यमाने व व्यक्तिगत पातळीवर देखील काम करत आहेत. जसे रामकृष्ण मिशन, विवेकानंद केंद्र, सेवा भारती संस्था इत्यादी. तिथे एक गृहस्थ भेटले पी. आर. लालकुमार. PWD मध्ये काम करणारे सरकारी कर्मचारी. मूळचे केरळमधील. पण तिथे दुर्गम गावात, सीमारेषेवरील एका गावात शेती व ग्रामविकासाचे काम करत आहेत. त्यांनी तिथे असणारा भष्ट्राचार,Insurgency, लोकांची समज, संस्कृती इत्यादी विषयांसंबंधीत त्यांचे अनुभव शेअर केले.

· चीन देशाची सीमा लागून असल्याने भारताला त्या भागातील विकासासंबंधी जास्त महत्व देणे क्रमप्राप्त आहे. सध्या तेथील अनेक तरुणांना चीनमधील झगमगाटाचे आकर्षण आहे. विवेक पोंक्षे सर (ज्ञान सेतू उपक्रमाचे व EARC विभागाचे प्रमुख) म्हणतात, "Westernisation झाले म्हणजेmodernisation झाले असे नाही, हे लक्षात घ्यायला पाहिजे" हे खरे वाटते. राहणीमान बदलत आहे. पण विचाराने, संस्कृतीने पुढे जाणे हे देखील गरजेचे आहे. सध्या शेती, उद्योगधंदे, व्यापार इत्यादी एकूणच कुठलाही व्यवसाय करण्यासाठी तिथले वातावरण अनुकूल नाही. लोकांच्या हाताला आणि डोक्याला काम मिळून त्यांची उर्जा विधायक कामासाठी वापरून participatory approach ने त्या भागाचा विकास होणे गरजेचे आहे.

· या बरोबरच 'सरहद को स्वरांजली' हा संस्कार भारती संस्थेने आयोजित केलेल्या कार्यक्रमात सहभागी होता आले. १९६२ च्या चीन-भारत युद्धाच्या वेळी 'ए मेरे वतन के लोगो...' हे गाण लता मंगेशकर यांनी गायलं होतं. याला ५० वर्षे पूर्ण झाली म्हणून हा कार्यक्रम होता. गायन स्पर्धा व पूर्वांचल मधील सात राज्ये व सिक्कीम या आठ राज्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते. यामध्ये आम्हाला आठ ही राज्यांच्या संस्कृतीची झलक एकाच व्यासपीठावर बघायला मिळाली.


या सगळ्या अनुभवाने आपण एका व्यापक समाजाचे भाग आहोत याची जाणीव झाली. ही व्यापकता आणि विविधता फक्त राहणीमान, संस्कृती मध्येच नाही तर समस्यांमध्ये देखील आहे.

**अश्विन भोंडवे,**

**ज्ञान प्रबोधिनी हराळी.**

For more information and participation, please visit:http://gyansetuerc.wordpress.com/








## ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्र

पत्ता : 'विनायक भवन', ५१४ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

दूरभाष : २४२०७१९३, २४२०७१९४

ई – मेल : erc@jnanaprabodhini.org

Visit us at : www.erc-pune.org